जावक क्रमांक ८५७९/२०२३
लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर
दिनांक ०६.११.२०२३

प्रति,
मा. जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

**प्रतिवेदक** – हनुमंत तरटे, पोलीस उप-निरीक्षक, लोणी काळभोर पोलीस ठाणे,पुणे शहर यांजकडुन विनंतिपुर्वक कि,

**विषय** – लोणी काळभोर पोलीस ठाणे गु.र.नं. २९३/२०२३ कलम भा.दं.वि. ३६३ या गुन्हयातील अपह्रुत मुलीचा तपास होणेकरिता वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणेबाबत...

---ooo---

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर कि, लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २९३/२०२३ भा.दं.वि.कलम ३६३ अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे – सुभाष महादेव उकरंडे वय ३६ वर्षे धंदा : हमाली रा. वाकवस्ती, पांडवदंड रोड, कदमवकवस्ती, लोणीकाळभोर ता. हवेली जि. पुणे मुळ रा. आळंद ता. गुलबर्गा, कर्नाटक राज्य मो.नं. ७५५८३४३१४५ यांची फिर्याद कि, दि.०१/०५/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वा. ते ०६.०० वा. चे सुमारास पांडवदंड रोड, वाकवस्ती, कदमवाकवस्ती ता. हवेली जि. पुणे येथुन फिर्यादी यांचे राहते घरातुन भाची नामे कशीश संतोष काळे वय १७ वर्षे हीला कशाचे तरी आमिष दाखवुन फिर्यादी व त्यांचे बहीणीचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे. म्हणुन फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरुध्द लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोद करण्यात आला आहे. नमुद अपह्रुत मुलीबाबत आजुबाजुस व इतरत्र ठिकाणी चौकशी करता त्याचे बाबत काहीएक उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. तरी त्याचा शोध होणेस विनंती आहे.

**<u>अपह्रुत मुलाचे वर्णन खालीलप्रमाणे</u>**

| | **अपहत मुलाचे वर्णन** |
|---|---|
|  | नाव :- कशीश संतोष काळे वय १७ वर्षे<br>बांधा मजबुत, रंग काळा, उंची ०५ फुट, नेसणीस – पिवळे रंगाचा पंजांबी ड्रेस, कपाळावर मधोमध गोल ठिपका गोंदलेला आहे.<br>भाषा - मराठी, हिंदी<br>पायात – चप्पल व काळा दोरा आहे.<br>शिक्षण – ०८ वी पास |

तरी वर नमुद वर्णनाच्या मुलीचा आजपावेतो सर्वोतपरी शोध घेवुनही ती मिळुन आली नाही. तरी वर नमुद वर्णनाच्या मुलीचे छायाचित्र व वर्णनाची प्रसिध्दी वर्तनामपत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

मा. सादर व्हावे

(हनुमंत तरटे)
पोलीस उपनिरीक्षक
लोणीकाळभोर पो.स्टे. पुणे शहर

मार्फतीने सादर,
मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
लोणीकाळभोर पो.स्टे. पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
लोणी काळभोर पोलीस स्टेशन
पुणे शहर